Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - IV
October - December - 2020
English / Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com




Scanned with OKEN Scanner

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महाविद्यालयीन मुलींच्या शारिरीक क्षमतेवर सुर्यनमस्काराचा परिणाम<br>**डॉ. आशा संजय देशमुख**<br>**प्रा. देवीसिंग फकीरा राठोड**<br>**प्रा. शहाजी उत्तमराव चव्हाण** | १-५ |
| २ | दलित कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान: जग बदलण्याचे हत्यार<br>**डॉ. शिवाजी विश्वनाथ डोळसे** | ६-१३ |
| ३ | दलित कवितेतील विद्रोह<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | १४-१६ |
| ४ | 'बौद्ध आणि मूल्य शिक्षण' (बोद्ध च अग्घ सिक्खनं)<br>**प्रा. डॉ. भिक्खू एम. सत्यपाल** | १७-२० |
| ५ | कोविड-१९: पारंपरिक शिक्षणपद्धतीवर परिणाम<br>**डॉ. नीता र. तोरणे** | २१-२६ |
| ६ | समाजव्यवस्थेवर झालेले दूरगामी परिणाम : एक अभ्यास<br>**डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर** | २७-२९ |
| ७ | मराठी दलित कवितेचा इतिहास<br>**प्रा. डॉ. संगीता दोंदे** | ३०-३५ |
| ८ | जागतिक शांतता आणि बुद्ध धम्म<br>**शिवानंद सुखदेव साळवे** | ३६-३८ |
| ९ | बीड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय एक भौगोलिक अभ्यास<br>**डॉ. घुगे एस. पी.** | ३९-४४ |
| १० | मराठी दलित कवितेचा इतिहास<br>**डॉ. सरला वासुदेव गोरे** | ४५-४८ |
| ११ | आंबेडकरी विचारांना तेवत ठेवणारा तुफानातला दिवा :वामनदादा कर्डक<br>**डॉ. मिलिंद माणिकराव वाव्हळे** | ४९-५३ |




Scanned with OKEN Scanner

20-21

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

Rani Laxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist. Jalgaon

# ६. समाजव्यवस्थेवर झालेले दूरगामी परिणाम : एक अभ्यास

डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर
राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, जि. जळगाव.

### प्रस्तावना

आज अखिल जगतात कोरोना व्हायरस ने थैमान घातले आहे .या महामारी मुळे दररोज हजारो निरपराध लोक बळी जात आहेत. या जीवघेण्या आजाराने जणू सारे विश्वच पादाक्रांत केले आहे. सारा मानवी समाज हवालदिल झालेला आहे. जागतिक महा सत्तेत अग्रस्थानी असलेल्या राष्ट्रां पासून छोट्या-मोठ्या राष्ट्रा पर्यंत... नव्हे गाव वस्त्यांत पर्यंत कोरोना ने हाहाकार माजविला आहे. सारा मानवी समाज ढवळून निघाला आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सारी समाजव्यवस्था कोलमडून पडते की काय अशी भीती वाटायला लागली आहे. मानवी जीवनाच्या सर्वांगीण क्षेत्रांवर कोरोना ने लक्ष्यवेधी परिणाम केल्याचे दिसून येते.

### कोरोनामुळे निर्माण झालेला स्थलांतराचा प्रश्न

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सगळ्यात भयावह प्रश्नाला सामोरे जावे लागले तो म्हणजे स्थलांतराचा प्रश्न होय. यामध्ये अगदी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उच्चशिक्षण घेण्यास गेलेल्या तरुण वर्गापासून ते परदेशात नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने असलेल्या उच्चभ्रू वर्गापर्यंत... त्याचप्रमाणे पोटाची खळगी भरण्यासाठी परप्रांतात वास्तव्यास असलेल्या मजूर वर्ग या साऱ्यांनाच स्थलांतरामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला वेगवेगळ्या पातळ्यांवर सामोरे जावे लागले .कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाने टाळेबंदी जाहीर केली .या टाळेबंदी मुळे समाजाचा रंगच पालटून गेला. प्रशासनाचा हा निर्णय कोरोना चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी स्वागतार्ह होता ....नव्हे ती काळाची गरज होती. परंतु याची ची दुसरी बाजूही लक्षात घेतली पाहिजे समाजातील बहुतांशी वर्गावर या निर्णयाचे विपरीत परिणाम झाले . सारं काही सुरळीत सुरू असताना दैनंदिन जीवनक्रमाचे चक्र अचानक थांबले. नोकरी व्यवसायाच्या वाटा बंद झाल्या. चाकरमनी ,मजूर वर्ग चार भिंतीच्या आत बंदिस्त झाला .या निर्माण झालेल्या जीवघेण्या परिस्थितीवर कशी मात करावी हा यक्षप्रश्न निर्माण झाला. नोकरी-व्यवसायासाठी घराबाहेर पडता येत नाही .रोजंदारीवर काम करणाऱ्यांचा रोजगार बंद झाला. घरकाम करणाऱ्या महिलांना घरमालकांनी कामावरून काढून टाकले. ज्या घरात झोपडीत ते वास्तव्यास होते त्यांना त्यांचे घर भाडे देणे शक्य नाही म्हणून काही घरमालकांनी त्यांना घराबाहेर काढले. हाताला काम नाही आणि पोटाला भाकरी नाही. अशा विचित्र स्थितीला त्याला सामोरे जाणे भाग पडले. डोळ्यादेखत पोटची मुलं आणि पत्नी उपाशीपोटी कावराबावरा झालेली पाहणे त्याच्या नशिबी आलं. या साऱ्यातून त्याच्या नजरेसमोर एकच आशेचा किरण दिसला आणि तो म्हणजे गावाकडे स्थलांतर करणे हा होय. त्यानंतर त्याची जीवघेणी कसरत सुरू झाली. प्रशासनाने टाळेबंदी जाहीर केलेली असल्याने गावाकडे जाण्याचा त्याचा मार्ग बंद झाला. घराबाहेर महामारीचे संकट ,घरात उपाशीपोटी बायका- मुलं अशा भयानक